# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.01.2026** **वार- मंगळवार**

---

**दर्पणदिन**

राज्यभरात आज दर्पण दिन साजरा होत आहे. मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी वृत्तपत्र सुरू केल्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. या निमित्ताने पत्रकारिता महाविद्यालयांसह विविध संस्था संघटनांनी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन केलं असून, राज्यातल्या पत्रकारांना शुभेच्छा दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन केलं. जांभेकरांनी मराठी पत्रकारितेचा पाया भक्कमपणे उभारण्यासाठी मोलाचं कार्य केलं असं शिंदे म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही सर्व पत्रकारांना दर्पण दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**दिग्गजांची पत्रे**

समाजात पुन्हा एकदा मानवी मूल्ये आणि आपुलकी रुजवण्यासाठी सुसंवाद साधणे ही काळाची गरज आहे, असं प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉक्टर श्रीपाल सबनीस यांनी आज पुण्यात केलं. आज पुण्यातील पत्रकार संघात 'दिग्गजांची पत्रे' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ज्येष्ठ सबनीस बोलत होते . कार्यक्रमाच्या अध्यक्षसथानी सिम्बायोसिसचे कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर, एस. के कुलकर्णी , महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी आणि पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. दिग्गजांनी लिहिलेल्या पत्रांमधून नव्या पिढीला मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळते असं सबनीस यावेळी म्हणाले. आजच्या डिजिटल युगात अशा पुस्तकांच्या माध्यमातून पत्रांच्या जगाचं पुनरुज्जीवन होणं गरजेचं आहे असं डॉक्टर मुजुमदार म्हणाले.

**डाकविभाग**

डाक विभागाच्या सर्व मेल सेवांसाठी उपलब्ध असलेल्या डिजिटल पेमेंटच्या सुविधेला ग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत असून डिजिटल व्यवहारांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचं चित्र दिसून येत आहे. सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत एकंदर 3 लाख 62 हजार व्यवहारांमधून सुमारे 3 लाख 88 कोटी रुपये महसूल मिळाल्याची नोंद झाली आहे. पुढील काळात या डिजिटल पेमेंटचा वापर अधिक वाढेल आणि ‘डिजिटल इंडिया’ च्या उपक्रमाला अधिक हातभार लागेल असा विश्वास डाक सेवा पुणे क्षेत्राचे संचालक अभिजीत बनसोडे यांनी व्यक्त केला आहे.

**प्रशिक्षण**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगानं निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय स्तरावरील द्वितीय टप्प्यातील प्रशिक्षण आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि माडगूळकर सभागृहात आयोजित

करण्यात आलं होतं. तीन सत्रांमध्ये पार पडलेल्या या प्रशिक्षणात संगणकीय सादरीकरणाद्वारे प्रत्यक्ष मतदान आणि मतमोजणीच्या दिवशी करायच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आलं.

**भालबा-केळकर-स्पर्धा**

महाराष्ट्रीय कलोपासक आणि नाट्यसंस्कार कला अकादमी आयोजित भालबा केळकर नाटिका स्पर्धा येत्या 10 आणि 11 जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे. यात २२ संघांनी सहभाग घेतला असून स्पर्धेची सुरुवात ‘धूम रे धमाल’ या नाटिकेनं  होणार आहे. भालबा केळकर नाटिका स्पर्धेचे यंदाचं 33वे वर्ष आहे. स्पर्धा दोनही दिवस भरत नाट्य मंदिर येथे दुपारी १ ते ४ आणि सायंकाळी 5 ते ८ अशा दोन सत्रात होणार आहे.

**फुले फेस्टिव्हल**

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार केवळ स्मरणापुरते न राहता कृतीत उतरले पाहिजेत. भारतीय संविधानातील मूल्ये, लोकशाहीचं महत्व, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा संदेश तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी ‘संविधान जागर अभियान’ देशव्यापी पातळीवर राबविणार आहे," असं मत  विजय वडवेराव यांनी व्यक्त केलं. दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलच्या समारोपावेळी वडवेराव बोलत होते. नवी पेठेतल्या एस. एम. जोशी फाउंडेशनच्या सभागृहात झालेल्या या महोत्सवात देशविदेशातून 800 कवी, साहित्यिक, विचारवंत, कलाकार सहभागी झाले होते.

**कलमाडी निधन**

माजी केंद्रीय मंत्री आणि पुण्याचे माजी खासदार सुरेश कलमाडी यांचं आज पहाटे पुण्यात निधन झालं. ते 82 वर्षांचे होते. काही दिवसांपासून ते आजारी होते. कलमाडी हाऊस या निवासस्थानी आज त्यांचं पार्थिव दर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. त्यानंतर दुपारी साडेतीन वाजता वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. राज्यसभेच्या माजी खासदार वंदना चव्हाण, माजी आमदार हर्षवर्धन पाटील, उल्हास पवार, रमेश बागवे, विश्वजीत कदम, तसंच ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्यासह

काँग्रेस पक्षाचे आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येनं उपस्थित होते. यामध्ये उपस्थित होते. तत्पूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार आणि हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ , राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील कलमाडी त्यांच्या निवासस्थानी जाऊन अंत्यदर्शन घेतलं.

पुणे शहराच्या सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देण्यात कलमाडी यांचा मोलाचा वाटा होता. पुणे फेस्टिव्हल आणि पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनसारख्या उपक्रमांची सुरुवात करून त्यांनी पुण्याला राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख मिळवून दिली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**